# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००१३२७**

**अपिलार्थी श्री. विनय वामन हुले**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (जी/उ विभाग)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जी/उ विभाग)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०५.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.११.२०२४ | ०१.०१.२०२५ | ०७.०३.२०२५ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०६.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०१.०१.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थींनी दि. १४.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार द्वारकामाई सह. गृह. निर्माण संस्था (मर्या) या झो.पु. योजनेत बांधलेल्या इमारतीत १) श्री. असलम एम. कुरेशी, PAP, सदनिका क्र.-१६०२.२) श्री. केशव प्रेमजी गोहिल PAP सदनिका क्र.-१७०१.३) श्री. सदाशिव साहेबराव अलगुडे, PAP सदनिका क्र. 1702.4) श्री. बाळासाहेब गणपत कचरे, PAP सदनिका क्र. 1801.5) श्री. अब्दुल हरीब खान, PAP सदनिका क्र. 1802 या सदनिकेचे वाटप झोपुप्राने दि. २१.०७.२०१४, दि. ३१.०५.२०१५, दि.२१.०७.२०१७, रोजी पी.ए.पी सदनिकांचे वाटप केले होते. सदर PAP सदनिकांचे वाटप द्वारकामाई एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या). या इमारतीत अंदाजे गेल्या ८ ते १० वर्षापुर्वीच झालेले असताना देखील सदर वाटप करण्यात आलेल्या PAP सदनिका हया आता विकासक त्याच्या दुसऱ्या योजनेत ज्या नियमाच्या अनुषंगाने हस्तांतरीत करू शकतो तसेच हस्तांतरीत करता येते याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाच्या, कार्यालयीन आदेशाच्या सर्व व संपुर्ण प्रती देण्यात याव्यात. तसेच गृहनिर्माण विभाग मंत्रालय यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाच्या, अध्यादेशाच्या, अधिसूचनेच्या, कार्यालयीन आदेशाच्या सर्व व संपुर्ण प्रती देण्यात याव्यात. तसेच नगर विकास कार्यालयाने निर्गमित तसेच प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाच्या, अध्यादेशाच्या, अधिसुचनेच्या कार्यालयीन आदेशाच्या सर्व व संपुर्ण प्रती देण्यात याव्यात. तसेच याबाबत विकास नियंत्रण नियमावली 2034 मधील ज्या Regulation /section/clauses

..२/-

/sub-clauses मध्ये असलेल्या तरतुदीच्या सर्व व संपूर्ण प्रती देण्यात याव्यात. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दि. ०१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, आपल्या अर्जात विचारणा केलेली माहितीबाबत या विभागाच्या अभिलेखावरील प्रथम दर्शनी उपलब्ध माहिती विनाशुल्क सोबत जोडून देण्यात येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०७.०३.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, माहिती अर्जात नमूद केलेल्या ५ व्यक्तींना एकदा PAP सदनिका आवटित केल्यावर जेव्हा त्या योजनेचे एकत्रीकरण झाले तेव्हा दुसरी इमारतीतही सदनिकेचे PAP वाटप झाले आहे, त्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु देण्यात आलेली माहिती माहिती अर्ज प्रमाणे नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास काही उशिर झाला असल्यामुळे त्यांनी दि. ०१.०१.२०२५ रोजी अपिलार्थींना निशुल्क माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांच्या म्हणण्याप्रमाणे ज्या लोकांना PAP योजनेत सदनिका वाटप झाली आहे, त्यांना दुसऱ्या इमारतीत सदनिका वाटप करण्यात आलेली नाही.

५. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केल्याप्रमाणे त्यांनी तसे लेखी लिहून देण्याची आयोगास विनंती केली.

६. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी एकत्रित सुनावणी घेतात त्यामुळे लक्षात येत नाही की सदर सुनावणी कोणत्या प्रकरणाची आहे.

७. श्री. गोविंद मगर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यापुढे अपिलार्थींच्या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार विहित मुदतीत सुनावणी घेऊन स्वतंत्र आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी.

८. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती अर्जात नमूद लाभार्थींना एक PAP सदनिका वाटप झाल्यानंतर पुन्हा योजना एकत्रित झाल्यानंतर दुसऱ्या इमारतीत PAP सदनिका वाटपाविषयी स्पष्ट वस्तुस्थितीदर्शक उत्तर आदेशप्राप्तीच्या १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने कळविण्यात यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

प्रदीप व्यास
२७-५-२०२६

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**